॥ ॐ गं गणपतये नमः ॥



# श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे

व्यवस्थापन : सुवर्णयुग तरुण मंडळ

# मानव सेवा उपक्रम

**वाटचाल : देव मंदिराबरोबर मानव सेवेच्या महामंदीराकडे**

# मानवसेवा उपक्रम प्रस्तावना

## जय गणेश!

परम आदरणीय गणेशभक्तांना सविनय जय गणेश!

आपल्या सर्वांचे आराध्य दैवत, हृदयस्थ परमात्मा भगवान श्रीमंत दगडूशेठ गणपती बाप्पांच्या कृपा आशिर्वादाने; आपण श्रद्धेने दिलेल्या दान देणगीचा विनियोग हा वर्षभर अनेक मानवसेवा उपक्रमांद्वारे ट्रस्टच्यावतीने कसा केला जातो, हयाची सविस्तर माहिती आपल्याला व्हावी यासाठी ही माहिती पुस्तीका आम्ही सादर करीत आहोत. १८९३ साली श्रीमंत दगडूशेठ गणपती बाप्पांची गणेशोत्सवाद्वारे सुरु झालेली ही वाटचाल अनेक खडतर प्रवास करत, अनेक बदल स्विकारत, हजारो कार्यकर्ते आणि त्यांच्या कुटुंबियांच्या श्रमातून, त्यागातून, गणेश भक्तीतून आज बहरलेली आहे, फुललेली आहे आणि विश्वव्यापी झालेली आहे. या गणेश भक्तीची आणि मानवसेवेची बीजे लावणाऱ्या सुवर्णयुग तरुण मंडळाच्या त्या सर्व महान शेकडो, हजारो कार्यकर्त्यांप्रती आम्ही सदैव सदैव कृतज्ञ आहोत.



श्रीमंत दगडूशेठ हलवाई यांचे गणपती बाप्पाचे दर्शन घेण्यास गणेशोत्सवात, राष्ट्रपती मा. फकरुद्दीन अली अहमद हे दिनांक २०/९/१९७४ रोजी पुण्यात आले होते



शालेय विद्यार्थी अथर्वशीर्ष पठण

ट्रस्टच्या उदिष्टांनुसार भक्तांच्या दानदेणगीतून आलेल्या निधी पैकी २५% रक्कम ही बाप्पांच्या धार्मिक कार्याकरीता तसेच ७५ % रक्कम ही समाजातील अतिशय उपेक्षित, वंचित, पीडित गोर गरीब घटकांसाठी विविध सामाजिक उपक्रमांद्वारे विनियोग केली जाते. ट्रस्टच्यावतीने संतांच्या 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले' ... या उक्तीप्रमाणे समाजातील विविध क्षेत्रातल्या गरजूंसाठी कार्य केले जाते, ज्याला कोणीही नाही आहे त्याला बाप्पांचा आशिर्वाद आहे हा विश्वास देण्याचा प्रयत्न मानवसेवा उपक्रमांच्या माध्यमातून ट्रस्ट सातत्याने करीत आहे. हया सेवा उपक्रम माहीती पुस्तिकेद्वारे ट्रस्टच्या शैक्षणिक, वैद्यकीय, पर्यावरणीय, जलसंधारण, स्किल कोर्सेस, ग्रामविकास, खेळ, सामाजीक बांधिलकी, समाज प्रबोधन, ईत्यादी मानवसेवा उपक्रमांची विस्तृत माहीती देण्यात आली आहे. “सार्वजनिक विश्वस्त संस्था या सत्ताकेंद्र न होता मानव सेवेच्या सेवा केंद्र व्हाव्यात” या उद्देशाने श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टची वाटचाल सुरु आहे. बापांच्या वतीने ट्रस्टच्या माध्यमातून होणाऱ्या या मानवसेवा महायज्ञात आपण देखील आपल्या सेवेची एक समिधा अर्पण करून बाप्पांचे आशिर्वाद प्राप्त करूयात. धन्यवाद! जय गणेश!!

**आपले विनम्र, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्व. गणपती ट्रस्ट पुणे, सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे.**



संगीत महोत्सवः गायन, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी




बाप्पांचे मंदिर, चैत्रशुद्ध प्रतिपदा गुढी पाडवा २ एप्रिल १९८४



देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांचा बाप्पांचे मंदिरात सन्मान! १ ऑगस्ट २०२३

# ससून रुग्णालय अन्नदान



रुग्णांसाठी अन्न वाटपाचे काऊंटर



चपाती करण्याचे अद्ययावत यंत्र



भाजी चिरण्याचे अद्ययावत यंत्र

पुण्यातील ससून रुग्णालय १00 वर्षे जुने आहे. ट्रस्टतर्फे ससूनच्या सुमारे ५000 स्क्वे फूट आकाराच्या स्वयंपाकघराचे नूतनीकरण करण्यात आले.

**साल २०१३ पासून हे अन्नदान ट्रस्टतर्फे सुमारे ३२00 बेड्सवरील रुग्णांना दिले जात असून यामध्ये दोन वेळेचे सकस शाकाहारी भोजन, अल्पोपहार, चहा, बिस्किट इत्यादीचा समावेश आहे.**

ट्रस्टतर्फे ससूनच्या स्वयंपाकघरास अद्ययावत यंत्रसामुग्रीही देणगी म्हणून दिली गेली आहे.

**या उपक्रमाव्दारे**
**३,२00 रुग्णांना**
**दररोज भोजन देण्यात येते.**

देणगी देण्यासाठी
QR कोड स्कॅन करा

# ससून रुग्णालय– प्रसूतिगृहाचे नूतनीकरण


रुग्णांच्या नातेवाईकांसाठी विश्रांतीगृह


नवजात शिशुंसाठी अतिदक्षता विभाग


नूतनीकरण केलेला प्रसूती वॉर्ड क्र. २१


६६ बेड्सचा नूतनीकरण केलेला प्रसूती वार्ड क्र. १९

ससूनमधील पाच नूतनीकरण केलेल्या प्रसूती वॉर्डमध्ये सरकते दरवाजे, मच्छरदाणी आणि कर्मचारी कक्षांचा समावेश आहे. वॉर्डमध्ये व्हेंटिलेटर, ऑक्सिजन पंप आणि ग्रॅनाइटच्या भिंती आहेत. पाच मॅटर्निटी वॉर्ड अपग्रेड करण्यात आले.

**प्रसूतीनंतर मातांना शेंगदाण्याचे लाडू आणि औषधे मोफत दिली जातात.**

**रुग्णांसाठी ३०० खाटा उपलब्ध करून दिल्या.**

# ससून रुग्णालय NICU वॉर्ड



महाराष्ट्रातील सर्वोत्तम ७९ बेडचा अद्ययावत NICU

मे २०१७ मध्ये ट्रस्टतर्फे NICU वॉर्ड बांधला गेला. या वॉर्डमध्ये दगडूशेठ गणपती ट्रस्ट आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या (फिनोलेक्स) सहयोगाने सुविधा निर्माण केल्या गेल्या. **७९ बेड असणाऱ्या या वॉर्डमध्ये माईल्ड, मॉडरेट, क्रिटिकल व मोस्ट क्रिटिकल अशा उपचार सुविधा आहेत.** मातांसाठी प्रतीक्षा कक्ष असणारा महाराष्ट्रातील हा पहिला NICU वॉर्ड आहे. येथे 'मदर मिल्क बँक' सुविधा उपलब्ध आहे. हा वॉर्ड अद्ययावत वैद्यकीय उपकरणांनी सज्ज आहे. **हा महाराष्ट्रातील सर्वोत्तम NICU वॉर्ड गणला गेला आहे.**

**या वॉर्डमध्ये मातांसाठी स्तनपान व प्रतीक्षा कक्षाचा समावेश आहे.**

# जय गणेश रुग्ण सेवा अभियान



होमिओपॅथी तपासणी व औषधोपचार



औषध वाटप




कृत्रिम अवयव वाटप



श्रवणयंत्र वाटप

श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टच्या वतीने विविध प्रकारच्या रुग्णसेवा, मोफत अथवा सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येतात. ५० प्रकारच्या रक्त तपासण्या, ECG तपासणी, दंत तपासण्या करून त्यावर औषध वाटप केले जाते. ॲलोपॅथीसोबत होमिओपॅथी, आयुर्वेदिक औषधोपचार सुद्धा उपलब्ध करून देण्यात येतात.

गरजूंना श्रवणयंत्र, कृत्रिम अवयव तसेच व्हील चेअर वाटप करण्यात येते. हृदयविकारग्रस्त रुग्णांसाठी अद्ययावत कार्डियाक रुग्णवाहिकेचे लोकार्पण ट्रस्टतर्फे करण्यात आले.

**रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा**

# जय गणेश रुग्ण सेवा अभियान



व्हील चेअर वाटप



ट्रस्टच्या वतीने कार्डियाक रुग्णवाहिका लोकार्पण


नेत्र तपासणी


५० प्रकारच्या रक्त तपासण्या

# जय गणेश रुग्ण सेवा अभियान


ECG चेक अप


नेत्र तपासणी


श्रवणशक्ती परीक्षण


दंत तपासणी

# जय गणेश ज्ञानवर्धन अभियान


कॉम्प्युटर ट्रेनिंग


विद्यार्थी प्रशिक्षण


ई-लर्निंग


संस्कार वर्ग


शालेय साहित्य


कराटे प्रशिक्षण

**जय गणेश ज्ञानवर्धन अभियान: पुण्यातील ५५० गुणवंत विद्यार्थ्यांना मदत.**

विद्यार्थी पालकत्व योजना: शालेयसाहित्य, फी कव्हरेज, संस्कार वर्ग, अध्ययन वर्ग, समुपदेशन, मोफत वैद्यकीय सेवा, विमा आणि सर्वसमावेशक समर्थन प्रदान करते.

अभ्यासक्रम आणि सुविधा: कौशल्य विकास, शालेय समुपदेशन, संगणक प्रशिक्षण, वैद्यकीय परीक्षा, सांस्कृतिक वर्ग आणि गणवेश आणि अभ्यास सामग्रीचे वितरण समाविष्ट आहे.

**आजपर्यंत सुमारे १००० विद्यार्थी उच्चशिक्षित होऊन आत्मनिर्भर झाले आहेत.**

**ट्रस्ट ५५ शाळांमधील ५५० मुलांना मदत करते.**

देणगी देण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# मोफत वैद्यकीय सुविधा खालीलप्रमाणे

१. हृदय आजार – अँजोप्लास्टी, बायपास सर्जरी, डीवाईस क्लोजर, पेसमेकर, व्हॉल्व रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया इ.

२. कर्करोग – केमोथेरपी, रेडिएशन, शस्त्रक्रिया इ. (ब्लड कॅन्सर सोडून)

३. किडनी आजार – डायलिसिस, किडनी स्टोन शस्त्रक्रिया, प्रोस्टेट ग्रंथी शस्त्रक्रिया

४. नेत्र विभाग – डोळे तपासणी, मोतीबिंदू, काचबिंदू, पडद्याच्या शस्त्रक्रिया

५. मोफत रक्त तपासणी केंद्र, धनकवडी, पुणे.

६. कृत्रिम हात व पाय बसवून देणे सुविधा.

७. मोफत श्रवणयंत्र मोल्ड आणि श्रवणयंत्र वाटप सुविधा.

८. ट्रस्टच्या माध्यमातून माफक दरात MRI, CT Scan, X-ray, Pet Scan आणि सोनोग्राफी सुविधा.

९. सन २०१३ पासून – ससून सर्वोपचार रुग्णालय येथे ॲडमिट रुग्णांना ट्रस्टच्या वतीने चहा, नाश्ता आणि दोन वेळचे जेवण दिले जाते.

१०. ट्रस्टच्या वतीने पुणे शहरामध्ये मोफत रुग्णवाहिका सेवा दिली जाते. तसेच रुग्णवाहिका पुणे शहराबाहेर घेवून जायची असल्यास फक्त डिझेल खर्च घेऊन उपलब्ध करून दिली जाते.

११. दर महिन्यास...आरोग्य शिबिराच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी, औषधे वाटप आणि विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया करुन दिल्या जातात.

१२. दर वर्षी पालखी सोहळ्यानिमित्त वारकरी संप्रदायाकरिता पुणे मुक्कामी व पुणे ते पंढरपूर मार्गी ट्रस्टच्या रुग्णवाहिकेतून तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत मोफत औषध वाटप करण्यात येते.

## मोफत रक्त तपासणी केंद्र, काशिनाथ पाटील नगर, धनकवडी, पुणे.

संपर्क : ९१४६१४२०२०

1. CBC (complete blood count)
2. Blood Group
3. Thyroid Profile
4. Lipid Profile
5. Liver Profile
6. Renal Profile
7. Sugar (Fasting & PP)
8. Sr. Creatinine
9. SGOT/SGPT
10. Uric Acid
11. Urea
12. BUN
13. ESR
14. Urine Routine

पुण्यातील धनकवडी भागात ट्रस्टने नुकतेच मोफत रक्त व विविध प्रकारची तपासणी केंद्र सुरू केले आहे.

या केंद्रामध्ये दररोज किमान ५० पेक्षा अधिक रुग्णांची तपासणी मोफत केली जाते.

**टीप : संस्थेच्या वतीने आर्थिक वैद्यकीय मदत दिली जात नाही याची नोंद घ्यावी**

संपर्क : २५० बुधवार पेठ, गणपती भवन

वेळ : सकाळी १०–६ वा । २४४७९२२२, २४४३०५२७

# जय गणेश ज्ञानवर्धन अभियान

जय गणेश ज्ञानवर्धन अभियानाची व्याप्ती वाढत आहे. हे अभियान केवळ दत्तक विद्यार्थ्यांपुरते मर्यादित नाही, आयटीआय आणि अन्य अभ्यासक्रम म्हणजे लहान लहान कोर्सेसही सुरू केले आहेत. त्यात पारंपारिक कोर्सपासून ते आधुनिक आर्टिफिशियल इंटेलिजन्सपर्यंत अनेक कोर्सेस सुरू केले आहेत. त्यातील अनेक कोर्सेस मोफत असून तंत्रज्ञान व काही कोर्सेस हे अल्प शुल्क आकारून शिकवले जातात. त्याची महिती खालील प्रमाणे...

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्व. गणपती ट्रस्ट, पुणे जय गणेश ज्ञानवर्धन अभियान अंतर्गत कोर्सेस -**

| अ.क्र. | कोर्स | तपशील | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | बी.बी.ए./ एम.बी.ए. | मोफत | १२वी / बी.बी.ए. / पदवीधर |
| २ | यु.पी.एस.सी. कोचिंग (IAS/ IPS) | मोफत | १२वी / पदवीधर |
| ३ | टॅली - जी.एस.टी. | मोफत | १२वी |
| ४ | डिजीटल मार्केटिंग | मोफत | १२वी |
| ५ | फॅशन डिजाईनिंग | मोफत | ८वी |
| ६ | ब्युटी अँड वेलनेस | मोफत | ७वी |
| ७ | लॉजिस्टीक्स | मोफत | १२वी |
| ८ | इलेक्ट्रिशियन | मोफत | १०वी |
| ९ | फुल स्टॅक जावा | मोफत | बी.इ./ बी.टेक/ बी.सी.ए/ एम.सी.ए/ बी.एस.सी. आय.टी |
| १० | मोबाईल रिपेअरिंग | मोफत | १०वी |
| ११ | आय.टी. हार्डवेअर | मोफत | १०वी |
| १२ | ग्राफिक डिजाईन | मोफत | १२वी |
| १३ | टू व्हिलर मेकॅनिक | मोफत | १०वी |
| १४ | फोर व्हिलर मेकॅनिक | मोफत | १०वी |
| १५ | ऑटोमोटिव्ह कन्स्लटंट | मोफत | १२वी |
| १६ | रेफ्रिजरेशन अँड ए.सी. रिपेअरींग | मोफत | १०वी |
| १७ | आर्टिफिशिअल इंटेलिजन्स विथ पायथन | मोफत | बी.इ./ बी.टेक/ बी.सी.ए/ एम.सी.ए/ बी.एस.सी. आय.टी |

DNYANADEEP'S IAS ACADEMY, PUNE
DNYANADEEP ACADEMY
For UPSC & MPSC

**मोफत अभ्यासक्रम**

हे सर्व कोर्सेस इयत्ता
१२वीच्या विद्यार्थ्यांसाठी आहेत.

**IAS Foundation Course**

MEKANTI
FASHION DESIGNER

**मोफत अभ्यासक्रम**

हे सर्व कोर्सेस इयत्ता
१०वी ते पदवीधरांसाठी आहेत.

१. आरी वर्क
२. फॅब्रिक पेंटींग
३. ड्रेस डिझायनिंग
४. चिल्ड्रेन गारमेंट्स

# कौशल्य विकास कोर्सेस

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट ने विविध क्षेत्रातील १३ कंपन्यांच्या सहकार्याने ६१ पेक्षा जास्त कौशल्य विकास कोर्सेस उपलब्ध केले आहे.

## TATA STRIVE — Right Skills Bright Future

**मोफत अभ्यासक्रम**

हे सर्व कोर्सेस इयत्ता ८वी ते पदवीधरांसाठी आहेत.

१. ऑटोमोटिव्ह कन्सलटंट
२. इलेक्ट्रीकल वेहिकल कन्सलटंट
३. बिझनेस डेव्हलपमेंट एक्झीक्युटीव्ह – बँकींग
४. कस्टमर केअर एक्झीक्युटीव्ह कॉल सेंटर
५. कस्टमर इंटरॲक्टीव्ह सर्विसेस
६. ऑटो सेल्स कन्सलटंट
७. असिस्टंट ब्यूटी थेरपिस्ट
८. टू व्हीलर सर्विस टेक्निशियन
९. फोर व्हीलर मेकॅनिक, सर्विस टेक्निशियन
१०. बिझनेस डेव्हलपमेंट एक्झीक्युटीव्ह – बँकींग
११. जनरल डयूटी असिस्टंट
१२. रिटेल सेल्स असोसिएट्स
१३. (E.D.P) – मोफत प्रशिक्षण त्याचबरोबर व्यवसायासाठी अर्थसहाय्य (Refund Basis)

## 'लाईटहाऊस'

**मोफत अभ्यासक्रम**

हे सर्व कोर्सेस इयत्ता १०वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी आहेत.

१. कॅफे मॅनेजमेंट कोर्स
२. डिजिटल मार्केटिंग
३. ऑफीस एक्झीक्युटीव्ह
४. अकाऊंट्स एक्झीक्युटीव्ह
५. ग्राफिक डिझायनिंग
६. टेलरिंग अँड फॅशन डिझाईन

## FBS FUEL TRUST

**मोफत अभ्यासक्रम**

हे सर्व कोर्सेस किमान १२वी पास

१. BBA (CA)
२. BBA (IB)
३. PGDM (MBA)

हे सर्व कोर्सेस पदवीधरांसाठी

१. फुल स्टॅक जावा
२. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स विथ पायथन

BBA (CA, IB) साठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती उपलब्ध केली.

## U·S·D·C Unique Skill Development Center

UNIQUE EDUCATION SOCIETY

**मोफत अभ्यासक्रम**

हे सर्व कोर्सेस किमान १०वी पास

१. मल्टिस्कील टेक्निशियन इलेक्ट्रीकल
२. सर्व्हिस टेक्निशियन होम अप्लायन्सेस
३. सर्व्हिस टेक्निशियन आय टी हार्डवेअर

हे सर्व कोर्सेस पदवीधरांसाठी

१. असिस्टंट कॉम्प्युटर ऑपरेटर
२. डोमेस्टिक डेटा एन्ट्री ऑपरेटर

## गरवारे कॉलेज

**मोफत अभ्यासक्रम**

हे सर्व कोर्सेस इयत्ता १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी आहेत.

CET Preparation For

१. BBA
२. BBA-IB
३. BBA-CA
४. BBA-D&I

# कौशल्य विकास कोर्सेस

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट ने विविध क्षेत्रातील १३ कंपन्यांच्या सहकार्याने ६१ पेक्ष्या जास्त कौशल्य विकास कोर्सेस उपलब्ध केले आहे.

## 'लाईटहाऊस'

यांच्या संयुक्त विद्यमाने

कोर्सजिम ट्रेनर कोर्स,
न्यूट्रीशियन कोर्स

अत्यल्प दरात

## Tech Mahindra

यांच्या संयुक्त विद्यमाने प्रमाणपत्र कोर्स

हॉस्पिटल फ्रंट ऑफीस व
बिलींग एक्झिक्युटिव्ह

अत्यल्प दरात

## VIPLA FOUNDATION

यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी कोर्स

बी.पी.ओ आणि रिटेल एंड सेल्स,
ब्यूटी अँड वेलनेस, बँकींग अँड फायनान्स
सर्विस इन्शूरन्स

अत्यल्प दरात

## CA Sayali's Success Mantra PROFESSIONAL ACADEMY

यांच्या संयुक्त विद्यमाने

अकाऊंट्स,
इकॉनॉमिक्स, मॅथ्स

अत्यल्प दरात

## e-saheli

यांच्या संयुक्त विद्यमाने

मेकअप आर्टिस्ट, हेअर स्टायलिंग,
नेल आर्ट, मेहंदी आर्टिस्ट,
आर्टिफिशीयल फ्लॉवर ज्वेलरी

अत्यल्प दरात

## ICMAI THE INSTITUTE OF COST ACCOUNTANTS OF INDIA

यांच्या संयुक्त विद्यमाने

CMA
Foundation Course

अत्यल्प दरात

## EKATVABHARAT FOUNDATION

यांच्या संयुक्त विद्यमाने

हॉटेल मॅनेजमेंट कोर्स

अत्यल्प दरात

## लिओ कॉम्प्युटर्स

यांच्या संयुक्त विद्यमाने

Advance Excel Course
M.S Office Course

अत्यल्प दरात

## गरवारे कॉलेज

यांच्या संयुक्त विद्यमाने

डिजीटल मार्केटिंग कोर्स, टॅली प्राईम विथ
जी.एस.टी. कोर्स,
जर्मन लँग्वेज ओरीएंटेशन कोर्स

अत्यल्प दरात

# कुष्ठरोगी आत्मनिर्भर केंद्र



बँडेज बनवणे



बँडेज बनवणे



शॉप फ्लोअरवरील काम



ट्रकचे पार्टस्

**पुण्यातील येवलेवाडी येथील डॉ. जाल मेहता मेमोरियल अपंगोद्धार औद्योगिक सहकारी संस्थेस ट्रस्टने सुमारे ६० लाख रुपयांची देणगी दिली.**

या केंद्रामध्ये TATA ट्रकचे पार्ट तसेच ससून व येरवडा मेंटल हॉस्पिटलसाठी बँडेज बनविण्याचे काम होते.

ट्रस्टने संस्थेला दिलेल्या देणगीमुळे फॅक्टरी पुन्हा एकदा सुरु झाली. **सुमारे ३०० कुटुंब स्वावलंबी होऊन आत्मनिर्भर झाली आहेत.**

**या उपक्रमाद्वारे ३०० कुटुंब आत्मनिर्भर झाली.**

# जय गणेश जल संवर्धन अभियान







पिंगोरीसारख्या दुष्काळग्रस्त गावात दगडूशेठ हलवाई ट्रस्टनं 'जय गणेश जलसंवर्धन अभियान' हाती घेतलं आणि गावात असणाऱ्या तलावातील गाळ काढून, तलाव पुन्हा जिवंत केला. यामुळे गावात पाण्याचा साठा वाढला, शेतीला आधार मिळाला आणि लोकांमध्ये ऐक्य निर्माण झालं.

आता ठिबक सिंचन, सेंद्रिय शेती, वृक्षारोपण, गोशाळा आणि ई-लर्निंगसारखे उपक्रमही सुरू आहेत. हा केवळ पाण्याचा नव्हे, तर संपूर्ण गावाच्या नवचैतन्याचा प्रवास आहे. बाप्पाच्या आशीर्वादातून एकत्र आलेल्या हातांनी घडवलेल्या परिवर्तनाने गाव स्वयंपूर्ण झाले.

**पिंगोरीत जलाशय पुनरुज्जीवन, ५१ कोटी लिटर पाणी साठवले**



## ग्रामीण भागातील जलसंवर्धन, पिंगोरी



पुरंदर तालुक्यातील पिंगोरी गावामध्ये सन २०१३ च्या दुष्काळामध्ये जलाशयातील गाळ काढण्यात आला.

जलाशयातील विसर्गामुळे पाण्याची क्षमता **५१ कोटी लिटर** झाली. पिंगोरीच्या आसपासच्या १० गावांना आता पाणी उपलब्ध झाले आहे.

गावांच्या स्वयंपूर्णतेच्या प्रयत्नांमध्ये **धरणांचे निर्जतुकीकरण, वृक्षारोपण, गोठा, ठिबक सिंचन, वीजनिर्मिती, कृषी पर्यटन आणि ई-लर्निंगचे शिक्षण** यांचा समावेश होतो.

**या भागात ट्रस्टने सुमारे ५०,००० रोपांचे रोपण केले आहे.**

## वृक्षारोपण



वारी मार्ग, अष्टविनायक मार्ग आणि महाराष्ट्रातील प्रमुख महामार्गांवर **५० लाख** झाडे लावण्याचा उपक्रम करण्यात आला, तसेच झाडांना संरक्षक जाळ्याही लावण्यात आल्या.

**वड, पिंपळ, चिंच, आंबा** अशा रोपांची लागवड करण्यात आली.

महाराष्ट्रातील रस्ते आणि महामार्गालगत वृक्षारोपण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

**पालखी मार्गावर ५०,००० रोपांची लागवड करण्यात आली.**

देणगी देण्यासाठी QR कोड स्कॅन करा

# जय गणेश आपत्ती निवारण अभियान



पुरंदर तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावांना चारा वाटप



## चारा वाटप

दुष्काळी परिस्थितीत केवळ तात्पुरती मदत न करता, दीर्घकालीन उपायांचीही तितकीच गरज आहे, हे लक्षात घेऊन दगडूशेठ ट्रस्टने पुरंदर तालुक्यातील दहा गावांना दर्जेदार चारा पुरवला. गावकऱ्यांनीही देवकार्य समजून साथ दिली. ऊस, हिरवी हुंडी आणि मका याचा पुरवठा झाला. वनीकरण, ठिबक सिंचन यांसारख्या उपायांचीही आखणी झाली.

बारामतीचे मयूरेश गायकवाड, अमित झांबरे पाटील आणि तेजसिंह राजेनिंबाळकर यांनी ही जबाबदारी हक्कानं उचलली. पिंगोरीसारख्या गावात दीर्घकालीन उपायांची पायाभरणी करण्यात आली.

**दुष्काळग्रस्त जनावरांना मोफत चारा, जीवनाचा आधार.**

# जय गणेश आपत्ती निवारण अभियान









## निमगाव केतकी – गारपिटग्रस्त शेतमजुरांना घरे!

निमगाव केतकी, ता. इंदापूर या गावात गारपीट ग्रस्त १२ शेतमजुरांना ३०० चौ. फुटांची पक्की घरे ट्रस्टच्या वतीने बांधून देण्यात आली. यामुळे ग्रामीण भागातील शेतमजूर बांधवांना बाप्पांच्या कृपेचा आसरा लाभला. नुसती पत्र्याची शेडच नाही, तर जगण्याची नवी उमेद ट्रस्टनं दिली...

खरं सहकार्य हे अशा वेळी दिलं जातं, जेव्हा माणूस पूर्णपणे तुटून गेलेला असतो.

गारपीटग्रस्त शेतकऱ्यांसाठी
**मोफत घरे,**
बाप्पांच्या कृपेचा आसरा

## मोफत रुग्णवाहिका




**वर्षभर**
**१२ रुग्णवाहिका**
**उपलब्ध आहेत.**

साल १९८९ मध्ये ट्रस्टतर्फे ही सुविधा पुणे महानगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या रुग्णांसाठी सुरु केली गेली. पुणे महानगरपालिका क्षेत्राबाहेरील नागरिक डिझेल साठीचे पैसे भरून या सेवेचा लाभ घेऊ शकतात.

रुग्णवाहिका सेवा: पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड हद्दीतील रुग्णांसाठी २४ तास मोफत रुग्णवाहिका, बाहेरील मर्यादा फक्त डिझेल किमतीवर उपलब्ध.

**संपर्क: ७७७४०१४६४६, ७७७४०२४६४६ उपलब्ध आहेत.**

देणगी देण्यासाठी
QR कोड स्कॅन करा

## वॉटर टँकर सुविधा




दुष्काळग्रस्त भागात दैनंदिन पाणीपुरवठा

**या उपक्रमातून पुरंदर तालुक्यातील दुष्काळी भागात दररोज**
**१ लाख लिटर मोफत**
**पाणीपुरवठा केला जातो.**

या उपक्रमांतर्गत पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील दुष्काळ ग्रस्त वाडया वस्त्यांना दररोज सुमारे १ लाख लिटर इतका मोफत पाणीपुरवठा करण्यात येतो.

या भागातील वारी रस्ते, हायवे, तसेच पालखी तळावरील झाडांना टँकर द्वारे पाणी दिले जाते.

देणगी देण्यासाठी
QR कोड स्कॅन करा

# बालसंगोपन केंद्र



मैदानी खेळ व कवायत वर्ग



मुलांसोबत ज्येष्ठ



महाराष्ट्र शासनाने गौरवलेले - बालसंगोपन केंद्र



मुलांच्या निवासासाठी आधुनिक सुविधा

कोंढवा, पुणे येथे ट्रस्टतर्फे देवदासींच्या मुलांसाठी बालसंगोपन केंद्र स्थापन केले आहे. गेली ४० वर्षे चालू असलेले हे केंद्र **देवदासींच्या मुलांना अन्न, शिक्षण व राहण्याची सुविधा** पुरवते.

काच, पत्रे उचलणाऱ्या महिला भगिनींच्या **२५ मुलांचे पालकत्व.**

बाल संगोपन केंद्र: कोंढवा परिसरातील देवदासींच्या **१०० निराधार मुलांसाठी मोफत शिक्षण, भोजन, निवास, समुपदेशन इ.**

**या केंद्राच्या माध्यमातून सुमारे २००० मुले समाजाच्या मुख्य प्रवाहात आली आहेत.**

# बालसंगोपन केंद्र



जेष्ठांशी हितगूज




विद्यार्थी शिक्षण



विद्यार्थी परीक्षा



विरंगुळ्याचे क्षण

# पिताश्री वृद्धाश्रम



प्रशस्त वृद्धाश्रम



वृद्धाश्रमाचा प्रशस्त परिसर



आरामदायी खोली

मे २००४ मध्ये, ट्रस्टने कोंढवा, पुणे येथे वृद्धाश्रम स्थापन केले, त्यात सुसज्ज स्वयंपाकघर, बाग, वाचनालय, सभागृह आणि गणेश मंदिर आहे.

सुविधांमध्ये **नाश्ता, जेवण, करमणूक, व्यायाम आणि वैद्यकीय तपासणी** यांचा समावेश आहे, ज्येष्ठ नागरिकांना मदत करण्यासाठी कर्मचारी नेहमी तत्पर असतात.

कोविड- १९ महामारी दरम्यान, ट्रस्टने या वृद्धांची विशेष काळजी घेतली.

**वृद्धांसाठी ७५ आरामदायी खोल्या आहेत.**

देणगी देण्यासाठी
QR कोड स्कॅन करा

# जय गणेश जल संवर्धन अभियान







सन २०१५ रोजी पुण्याला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणातील गाळ काढण्याच्या कामाचा आरंभ **श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टने ३५० गणेश मंडळाच्या सहकार्याने ग्रीन थम्बचे कर्नल श्री. सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केला.** या उपक्रमामध्ये गाळ काढणे, वृक्षारोपण करणे, श्रमदान करणे, आणि जनजागृती करणे असे कार्य करण्यात आले. या उपक्रमामुळे पुणे शहराला १ महिना पुरेल इतका जास्तीचा पाणीसाठा उपलब्ध झाला. **केंद्र शासनाने हा उपक्रम पथदर्शी उपक्रम म्हणून स्वीकारला त्यामुळे देशातील अनेक धरणाचा गाळ काढण्याचा उपक्रम सुरु आहे.**

**खडकवासला धरणातील गाळ काढल्याने**
**१ महिना**
**जास्तीचा पाणीसाठा उपलब्ध झाला.**



# औद्योगिक प्रशिक्षण केंद्र



विद्यार्थी प्रशिक्षण




युवक औद्योगिक प्रशिक्षण केंद्र




विद्यार्थ्यांसाठी प्रॅक्टिकल

ट्रस्टतर्फे ऑगस्ट २००४ मध्ये ISO प्रमाणित केंद्र कोंढवा, पुणे येथे उभारण्यात आले. हे केंद्र लघुउद्योगासाठी लागणारे शिक्षण विद्यार्थ्यांना देते.

केंद्र व राज्य शासनाच्या मान्यतेने ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांसाठी ट्रस्टच्यावतीने कोंढवा येथे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु आहे. **१०० विद्यार्थ्यांची शिक्षण व्यवस्था केली आहे.**

**सुमारे २००० विद्यार्थी स्वयंपूर्ण झाले आहेत.**

# आषाढीवारी वैद्यकीय सेवा








मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप



सन १९८९ पासून ट्रस्टच्या वतीने आषाढीवारी दरम्यान **फिरता दवाखाना, डॉक्टर्स, औषधे उपलब्ध** करून दिली जातात.

आज मितीला संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत सोपानदेव महाराज या तीनही मार्गांवर फिरते दवाखाने (रुग्णवाहिका), डॉक्टर्स व औषधे ह्या सेवा मोफत दिल्या जातात.

वारकऱ्यांसाठी **मोफत नेत्र तपासणी** करून **चष्मे वाटप** देखील केले जाते.

**वारकऱ्यांसाठी**

## आरोग्यसेवा

**श्रद्धेच्या यात्रेला मिळाली स्वास्थ्याची साथ**

## राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा

## UPSC मुलांना मार्गदर्शन








### गणेशोत्सव स्पर्धा–पुणे/पिंपरी चिंचवड

१९६८ पासून राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धा, पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ३५० मंडळांच्या सहभागाने, केवळ सजावट नव्हे तर सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक कार्यालाही दिशा देण्याचा प्रयत्न करते.

ट्रस्टनं कार्यकर्त्यांचं प्रबोधन, सजावटीतून संदेश आणि शिस्तबद्ध उत्सव यांचा संगम साधत, गणेशोत्सवाचं पावित्र्य जपण्याचा ध्यास घेतला आहे. सीमेवरील जवानांपासून, समाजाच्या सर्व स्तरांचा विचार करत, हा उपक्रम उत्सवाचं रूपांतर समाजोपयोगी चळवळीत करतो- ही एक प्रेरणादायी परंपरा आहे, जी आजही तेवढ्याच ताकदीनं पुढे जाते आहे

**राष्ट्रीय स्पर्धेतून विधायक उत्सव, गणेशोत्सवाला दिली आदर्श दिशा**

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा केंद्रीय प्रशासकीय सेवेमध्ये (UPSC) सहभाग वाढावा याकरिता श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट व ज्ञानदीप अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने विनामूल्य UPSC प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात आले.

यामध्ये विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा व मुलाखती घेऊन योग्य व होतकरू विद्यार्थ्यांची निवड या माध्यमातून केली जाते. यामधून अनेक अधिकारी देश सेवेकरिता तयार होतील अशी अपेक्षा आहे.

**मराठी विद्यार्थ्यांना IPS/IAS अधिकारी होण्याकरिता ट्रस्टने सुरु केलेला उपक्रम.**

# जय गणेश अन्नदान सेवा







## वारकरी नाश्ता वाटप सेवा

**आषाढी वारीसाठी** पंढरपूरला निघालेल्या **संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम** महाराजांच्या पालख्यांचे मंदिराजवळ **फुलांची उधळण** करून आत्मीयतेने **स्वागत** करण्यात येते. या भक्तिमय क्षणी, वारकऱ्यांना प्रेमपूर्वक **बुंदीचा प्रसाद** देण्यात येतो.

पुण्यात मुक्कामाच्या दिवशी सकाळी **२०,००० वारकऱ्यांना नाश्ता वाटप** करण्यात येते हे ट्रस्टचे समाजाप्रती असलेले निस्वार्थ प्रेम आणि भक्तीमय योगदान दर्शवते.

**वारकऱ्यांना नाश्ता वाटप भक्तीचा आनंद**



# जय गणेश अन्नदान सेवा



भक्तांसाठी
**अन्नदान प्रसादाचे**
आयोजन.

## गणेश जन्म भोजन प्रसाद

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्या वतीने गणेशजन्मानिमित्त भक्तांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते

# वारकरी अन्नदान सेवा







## वारकरी भोजन वाटप सेवा – वाल्हे!

वाल्हे येथे पंढरपूरच्या वाटेवर थांबलेल्या **२५ हजार वारकऱ्यांना बाप्पांचा महाप्रसाद** देत **सुवर्णयुग तरुण मंडळाने** अपार श्रद्धेने सेवा केली आहे. आदल्या दिवसापासून तयारी करून, दुसऱ्या दिवशी दिवसभर कार्यकर्ते वारकऱ्यांच्या सेवेत अन्नवाटप करत असतात. या सेवेमागे **भक्ती, समर्पण आणि सामाजिक जाणिवेची** जिवंत भावना प्रतीत होते, जिथे **प्रत्येक घासात प्रेम आणि आपुलकी** भरलेली असते. हे केवळ अन्न नाही, तर त्या प्रवासासाठी मिळालेली आत्मिक ऊर्जाच असते.

वारकऱ्यांसाठी
**भोजनप्रसाद,**
भक्तिभावाने
केली सेवा.



# जय गणेश आपत्ती निवारण अभियान





## कोयना लातूर भूकंपग्रस्तांना मदत

पूर, भूकंप, दुष्काळ अशा अनेक आपत्तींच्या काळात ट्रस्टनं मदतीचा हात पुढे करत माणुसकी जपली.

कोयना भूकंप,पानशेत पूरग्रस्तांना मदत, लातूर- किल्लारी भूकंप, मोवाड पूर, कोकण, विदर्भ आणि आंबेगावमधील संकटात त्यांनी वेळेवर अन्नपाणी, छावण्या आणि आर्थिक सहाय्य पोहोचवलं. ५१ लाखांची मदत मुख्यमंत्री निधीस दिली.

कुपोषित आदिवासींसाठीही विशेष मदत केली. संकट कुठलंही असो - वेळीच, योग्य ठिकाणी, योग्य पद्धतीनं मदतीचा हात पुढे करणं, ही ट्रस्टची ओळख बनली आहे.

**आपत्तीग्रस्तांना तातडीची मदत, अन्न, वस्त्र आणि दिलासा.**

# शौर्य गौरव पुरस्कार




**देशाची आणि समाजाची सुरक्षितता, हेच खरे शौर्य!** दगडूशेठ हलवाई ट्रस्टनं हे ओळखून देशासाठी झटणाऱ्या जवानांना आपले मानले. २०१० साली, ट्रस्टच्या उपक्रमातील मुलांनी जवानांना राख्या पाठवल्या. मराठा बटालीयनच्या **२०० हुतात्मा जवानांच्या वीरपत्नी व वीरमातांसाठी** प्रत्येकी रु. २५०००, साडीचोळी आणि जीवनगौरव पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले.

या निमित्तानं सैनिक आणि ट्रस्ट यांच्यात स्नेहाचा पूल निर्माण झाला, जो आजही मजबूत आहे. एक सुसंवेदनशील आणि कृतज्ञ समाज म्हणून उभं राहण्याचा हा प्रेरणादायी प्रवास आहे.

**२००**
**हुतात्मा वीरांच्या**
**माता–पत्नी**
**सन्मानित**
**झाल्या**

# वृक्ष गणेशा प्रसाद – पर्यावरण सेवा







श्रद्धेला पर्यावरण सेवेची जोड



श्रद्धा आणि पर्यावरणसेवा यांचा अनोखा संगम म्हणजे 'वृक्ष गणेशा प्रसाद'. मंदिरात अभिषेकासाठी येणाऱ्या प्रत्येक भक्तांकडून वृक्षारोपण संकल्प केला जातो आणि प्रसादरूपात रोप दिले जाते.

एक छोटे रोप, पण मोठा बदल घडवण्याची प्रेरणा देऊन जाते. या उपक्रमाद्वारे प्रतिवर्षी सुमारे दीड लाख रोपे भक्तांपर्यंत पोहोचवण्यात येतात, जी आता हरित भविष्याची पेरणी करत आहेत.

**भक्तांसाठी प्रतिवर्षी**
**१,५०,०००**
**पवित्र रोपांचे वाटप**

# कोविड मुक्ती अभियान



भटक्या जनावरांना चारा वाटप



ग्रामीण भागातील गरजूंना अन्नवाटप



पिताश्री वृद्धाश्रमातील वृद्धांची आरोग्य तपासणी



पिताश्री वृद्धाश्रमातील वृद्धांना सॅनिटायझर वाटप

कोरोनाकाळात ट्रस्टने गरजूंना मायेची साथ दिली. निराधार महिलांना मोफत रेशन, आदिवासी भागात अन्नवाटप, तृतीयपंथीय व १०,००० गरीब कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्यात आले. सुमारे १०,००० साबण, मास्क आणि आरोग्यसामग्रीचे वाटप करण्यात आले.

खामगाव, बिबवेवाडी, आनंदनगर, कोंढवा अशा भागांतील अनेकांचे जीवन सावरण्याचा हा प्रयत्न होता. ट्रस्टने कोविड मदत केंद्रही सुरू केले, जेथे तातडीच्या तपासण्या, रुग्णवाहतूक व समुपदेशनाची सोय उपलब्ध करून दिली. अनेक रुग्णांना बेड्स, औषधे आणि लस उपलब्ध करून दिली.

ही मदत केवळ सेवा नव्हे, तर जिव्हाळ्याचं प्रतीक ठरली.

**१०,००० कुटुंबांना कोविड काळात जीवनदायी आधार**

# सुवर्णयुग सहकारी बँक




सुवर्णयुग सहकारी बँकेचे नियोजित प्रशासकीय मुख्यालय बाजीराव रोड, पुणे




१९७३ साली बुधवार पेठेतील श्रमिक वर्गासाठी दगडूशेठ ट्रस्टच्या वतीने सुरू केलेली **'सुवर्णयुग सहकारी बँक'** ही एक धाडसी सामाजिक चळवळ आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या सहकार प्रेरणेने स्थापन केलेली ही बँक सामान्यांचे आर्थिक स्वावलंबन साधण्यासाठी उभी राहिली.

समाजसेवेच्या मैदानावर उतरत, सुवर्णयुगाचा खरा आरंभ याच माणुसकीच्या बीजातून झाला. आज बँकेच्या **२२ शाखा असून सुमारे १६०० कोटींचा व्यवसाय** आहे. सचोटीपूर्ण व्यवहाराद्वारे बँकेने ग्राहकांचा विश्वास वृद्धिंगत केला आहे.

**कष्टकऱ्यांच्या श्रमाला प्रतिष्ठा देणारी**

**बाप्पांची बँक**

# दगडूशेठ स्पोर्ट्स





## हिंद केसरी स्पर्धा

१२५ वर्षांच्या सार्वजनिक उत्सवाच्या निमित्तानं दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टनं, महाराष्ट्राच्या मातीतील मल्लविद्येला प्रोत्साहन देत हिंद केसरी स्पर्धेचं आयोजन केलं. यामध्ये देशभरातील २०० मल्ल सहभागी झाले. उत्साह, ऊर्जा आणि भरगच्च प्रेक्षकांच्या उपस्थितीत दिल्लीच्या सुमितनं विजेतेपद पटकावलं. श्रीमंत दगडूशेठ हलवाईंच्या कुस्तीप्रेमाची आठवण करणारी ही स्पर्धा खेळ संस्कृती जपणारा प्रेरणादायी उपक्रम ठरली.

मल्लविद्येचा
**जागतिक ठसा**
उमटवणारी
हिंद केसरी स्पर्धा

ट्रस्टनं अनेक खेळाडूंना संधी, मदत आणि हक्काचं व्यासपीठ दिलं आहे. आज ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकत आहेत. ट्रस्टने आत्तापर्यंत २ वेळा हिंदकेसरी स्पर्धेचेही आयोजन केले आहे.

## सुवर्णयुग स्पोर्ट्स क्लब – महिला कबड्डी

सन १९९२ पासून दगडूशेठ ट्रस्ट चालवत असलेला 'सुवर्णयुग स्पोर्ट्स क्लब' हा केवळ स्पर्धांचा नव्हे, तर जीवनाला वळण देणारा सामाजिक उपक्रम आहे. हा क्लब कबड्डीसारख्या मातीतल्या खेळांसाठी कमी सोयी उपलब्ध असलेल्या भागातील मुलींना व्यासपीठ देतो. सुविधा नसल्या तरी त्यांच्या जिद्दीला मर्यादा नसते, हे त्यांनी दाखवून दिले आहे. हा उपक्रम फक्त खेळाडू नव्हे, तर आत्मविश्वास आणि भविष्य घडवणारा प्रयत्न आहे...

सुवर्णयुग क्लबने
दिले देशाला
**दोन कर्णधार**

येथे प्रत्येक यशामागे असते संघर्षाची एक प्रेरणादायक गोष्ट. या क्लबने सुमती पुजारी आणि दीपिका जोसेफ असे दोन कर्णधार भारताला दिले आहेत.

# पोलिओ निर्मूलन अभियान



१९८९-९० च्या रोगराईनंतर ग्रामीण भागातील **पोलिओ निर्मूलनासाठी दगडूशेठ ट्रस्ट** पुढे आला. शासनाची वाहने पोहोचू शकत नसलेल्या डोंगराळ भागात ट्रस्टने **टाटा ६०८ गाडी** दिली. डॉक्टर, सिस्टर, कंपाउंडर आणि शिपाई यांची टीम पहाटे निघून दिवसभर गावागावात लसीकरण करत असे. **भीमाशंकर, खेड, जुन्नर, पानशेत** इत्यादी दुर्गम भागांत ही सेवा पोहोचली.

ट्रस्टच्या मदतीमुळे मोहिमेचं यश ५० टक्क्यांवरून ९५ टक्क्यांपर्यंत पोहोचलं. ही मदत हजारो आदिवासी आणि शेतमजुरांच्या बालकांसाठी जीवनदायी ठरली. सुमारे १८  वर्षे ही मोहीम ट्रस्ट तर्फे राबवण्यात आली

पुणे जिल्ह्यात ट्रस्टचे गेली
**१८ वर्ष**
या मोहिमेमध्ये योगदान होते

# वीटभट्टी कामगार घरकुल योजना




## श्रमजीवी सक्षमीकरण/वीटभट्टी घरकुल योजना

ट्रस्टने वीटभट्टीवरील कामगारांना त्यांच्या घराचे स्वप्न साकार करून दिले आहे. १२ जुलै १९८५ रोजी सिंहगड रस्त्यावर पानमळा येथे गणपतीनगर वसले आणि अनेक कुटुंबांच्या आयुष्याला नवी कलाटणी मिळाली. मडके काकांसारख्या मार्गदर्शकांमुळे कामगारांचे जीवन सुधारले, मुलांना शिक्षण मिळाले आणि पुढच्या पिढ्या स्वतःचा व्यवसाय करू लागल्या. घर, शिक्षण आणि आत्मसन्मान या तीन गोष्टींमुळे त्यांचे दडपण गेले आणि ते नव्या उमेदीनं जीवनाकडे पाहू लागले. गणपतीनगर आजही त्यांच्या कृतज्ञतेचं प्रतीक आहे.

श्रमजीवी वीटभट्टी कामगारांसाठी

**घरकुले**

बांधण्यात आली

# कुपोषित बांधवांना धान्यवाटप




पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील घोडेगाव येथील गरजूंना ट्रस्टच्यावतीने धान्यवाटप

## धान्य वाटप

१९८९ पासून पुर, दुष्काळ, भूकंप अशा प्रत्येक आपत्तीत ट्रस्टनं तातडीनं मदतीचा हात पुढे केला. पूरग्रस्तांची घरे उभारली, भूकंपपीडितांना आधार दिला, दुष्काळात चारा – पाणी पोहचवले. गरजूंना अन्न, कुपोषितांना उपचार दिले.

योग्य वेळी योग्य ठिकाणी मदत करणे, हीच ट्रस्टची ओळख, आदर्श आणि श्रद्धा बनली आहे.

**कुपोषित बांधवांना धान्य वाटप, भुकेसाठी दिला जीवनदायी आधार.**



# समाज प्रबोधन, सामाजिक समानता, सामाजिक समरसता



समाज प्रबोधन : प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे व्याख्यान




शिवजयंती व्याख्यानमाला व्याख्याते कष्टकऱ्यांचे नेते डॉक्टर बाबा आढाव



पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपती उत्सवात पहिल्याच दिवशीं सोमवारी सायंकाळची आरती ३५ वर्षे भंगीकाम करणारे मातंग समाजातील श्री. गणपतराव डावरे व सौ. सरुबाई डावरे यांच्या हस्ते करण्यांत आली. शेजारी महापौर श्री. निळूभाऊ लिमये.

दैनिक केसरी पुणे, मंगळवार दि. १२ सप्टेंबर १९७२



बाप्पांच्या दर्शनास शहेनाई वादक भारतरत्न पंडित बिस्मिल्ला खान

# कृतज्ञता सन्मान



कृतज्ञता सन्मान प्रदान करताना मा. बाळासाहेब भारदे, पंडित भीमसेन जोशी आणि स्वीकारताना पोलीस महासंचालक के. के. कश्यप.



कृतज्ञता सन्मान प्रदान करताना तात्यासाहेब गोडसे, बाबासाहेब पुरंदरे, मामासाहेब रासने आणि स्वीकारताना जेष्ठ साहित्यिक रा. चिं. ढेरे

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्या वतीने समाजातील विविध क्षेत्रातील म्हणजेच शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, प्रशासन, कला, क्रीडा, उद्योग, संस्कृती आणि मानवसेवा उपक्रमांमध्ये स्वतःला संपूर्णपणे झोकून देउन समाजाच्या सर्वांगीण घटकाचे कल्याण करण्यासाठी झटणाऱ्या मान्यवरांना त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून कृतज्ञता पुरस्कार सुरु करण्यात आला

**समाजाप्रति समर्पीत व्यक्तींना**

**कृतज्ञता पुरस्कार**



गणेशोत्सवातील सजावट : बेलूर मठ कोलकाता



गणेशोत्सवः भक्तीचा महापूर

# ऋषिपंचमी: सामूहिक अथर्वशीर्ष पठण




बाप्पांची सामूहिक उपासना: ३५,००० भगिनींचे सामूहिक अथर्वशीर्ष पठण आणि महाआरती

# श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे

व्यवस्थापन : सुवर्णयुग तरुण मंडळ

## सामाजिक कार्यासाठी घेतलेला पुढाकार

वाटचाल देव मंदिराबरोबर मानवसेवेच्या महामंदिराकडे !!

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्यावतीने सामाजिक उपक्रमांद्वारे सुरू असलेल्या वाटचालीचे आपण सर्वजण साक्षीदार आहात. ही वाटचाल मोरयाच्या कृपेने भविष्यात अधिक समृद्ध होईल असा ट्रस्टला दृढ विश्वास आहे.

पुढील काळात भक्तांच्या वाढत्या संख्येचा विचार करीता भव्य, सुसज्ज अशी दर्शन रांग, पार्किंग, भक्त निवास, बाप्पांच्या सर्व धार्मिक पूजा सेवा, ऑनलाईन दर्शनसेवा याच बरोबर बाप्पांच्या स्वरूपाची ओळख व्हावी याकरीता बाप्पांचे आंतराष्ट्रीय अध्यात्मिक केंद्र, संग्रहालय, वेदपाठशाळा, गोशाळा, शैक्षणिक संकुल, वैद्यकीय सेवा केंद्र या सारख्या धार्मिक, अध्यात्मिक आणि मानवसेवा उपक्रमांची व्यवस्था व नियोजन ट्रस्टच्यावतीने करण्यात येत आहे. आपल्या सर्व गणेश भक्तांच्या भक्तीने प्रेरित होउन ट्रस्टच्या वतीने देवमंदिराबरोबर मानवसेवेच्या महामंदिराची ही वाटचाल अधिक प्रशस्त होईल असा आम्हाला विश्वास वाटतो. धन्यवाद जय गणेश !!

आपले विनम्र,
श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्व. गणपती ट्रस्ट, पुणे. सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे.

**गणपती भवन**
२५०, बुधवार पेठ, पुणे – ४११ ००२
**२४४७९२२२, २४४३०५२७**

**गणपती सदन**
१३२, बुधवार पेठ, पुणे – ४११ ००२
**२४४९६४६४, २४४९२०००**

@dagadushethganpati

@shrimantdagdushethganpati

Dagdusheth Ganpati

www.dagdushethganpati.com

Dagadusheth Ganpati

Shreemant Dagdusheth Ganpati